# -:: प्रकरण - चार ::-

## अलुतेदार आणि इतर व्यावसायिक

# प्रकरण - चौथे

## अलुतेदार आणि इतर व्यावसायिक

### प्रास्ताविक :

मराठेकालीन गावगाडयामध्ये गावकामगार वतनदार, मिरासदार आणि उपरी यांच्याप्रमाणे बलुतेदार आणि अलुतेदार यांचा समावेश होत असे. ज्यांची विद्या, कसब किंवा मेहनत कुणब्याला अथवा गावातील खाजगी व्यवहाराला आवश्यक असे तो " कारु " होय आणि ज्यांच्या धंद्यावाचुन कुणब्याचे नडत नसे. असा धंदा करणारा तो " नारु " होय. कारुला बलुतेदार किंवा बलुता आणि नारुला अलुतेदार किंवा अलुता म्हणता असत.[१]

शिवकाळात बलुतेदाराखेरीज गावात इतर कांही कारागीर असत आणि त्यांची सेवा ही गावक-याना अनिवार्य वाटत नसावी. आणि म्हणुनच समाजव्यवस्थेत त्याना विशेष असे स्थान दिले गेले नसावे. त्यांचा दर्जा उपरी लोकांसारखा असावा म्हणुन अशा सेवकांना अलुतेदार म्हणण्याचा प्रघात होता.[२]

अलुतेदारात प्रामुख्याने क कोळी, तेली, शिंपी, कासार, तांबोळी इत्यादी अनेक अलुतेदारांचा समावेश होत असे.

LIBRARY

कोळी :

पेशवेकालीन महाराष्ट्रात कोळी हा एक महत्वाचा व्यवसायिक होता. त्याचे मुख्य काम म्हणजे सार्वजनिक इमारतीतपाणी भरणे. विवाहा प्रसंगी पाणीपुरवठा करणे इ. होती. त्याबद्दल त्यास शेला व चार दिवस मेजवानी मिळे, चावडी स्वच्छ ठेवण्याचे, दिवा पाण्याची व्यवस्था पहाण्याचे तो काम करी. त्याला पाटलाच्या घरी पाणी - पुरवठा करावा लागे.[३] होळीच्या पुजेच्या वेळी होळीची जागा शिंपडण्याचे काम कोळयाला करावे लागे.[४]

कांही गांवे नद्यांच्या शेजारी असल्याने पावसाळयात अथवा बारमाही कांही नद्यांच्या पाण्याला उतार नसे. त्याठिकाणी कोळी आपल्या नावाद्वारे माणसांची व मालाची वहातुक करीत असत. परंतु याच्यावर कांही सरकारी कर असत. चिमाजी आप्पाच्या सैन्यास मार्ग दार्खविल्याबद्दल कलवेकर कोळयांच्या होडीचा कर माफ करण्यात आला होता.[५]

मासेमारीचा व्यवसाय देखील कोळी लोक करीत असत. मासे- मारण्यासाठी ते समुद्रावर जात असत. त्यांना या मासेमारी बाबत सरकारात कांही प्रमाणात कर द्यावा लागे. कोळयाच्या उपजिवीकेची साधने नष्ट झाल्यास त्याना करात सूट मिळे. चौळ, रेवदंडा, थेरवंडा, या तिन्ही गावातील कोळी समुद्रावर मासेमारीचा व्यवसाय करीत असत.[६]

मराठ्यांच्या राज्यात किल्ल्याभोवती संरक्षणासाठी चौक्या असत. त्या चौक्यावर रखवाली करण्यासाठी रामोशी आणि भिल्लाबरोबर कोळीही असत अशी माहिती मिळते.[७]

कोळी जातीत कांही पोटभाग होते. समुद्रावर मासे धरणारे हे सोनकोळी होत. पुरुष रात्री मासे पकडत असत आणि त्यांच्या स्त्रिया दिवसा मासे विकत असत.[८]

महाराष्ट्रात भौगोलीक परिस्थितीमुळे समुद्रकिना-याची मासेमारी आणि गोडया पाण्यातील मासेमारी असे क्षेत्र मत्स्यव्यवसायाला लाभले होते.[९] सागरी पाण्याच्या मासेमारीत कोलंबी, चिंबोरी, माकुळ, कालवे, शिवळ्या बोंबील, सरंगा, हलवा, इत्यादी माशाचा समावेश होत असे. पेण, पनवेल, रोहा, नागोठाणे, कल्याण इत्यादी बंदरातुन कोळी मासे आणुन विकत असत.[१०] सागरी मत्स्यव्यवसाया-बरोबर गोडया पाण्यातील मासेमारी ही होत असे. महाराष्ट्रात गोदावरी, कृष्णा, कोयना, तापी, पुर्णा, भिमा, निरा, मुळा, मुठा, इत्यादी नद्यामधुन मासेमारी चाले.

मासे मारण्यासाठी विशिष्ट असा हंगाम असे. पावसाळा आल्यानंतर मासेमारी बंद होत असे. ऑगस्ट महिन्यापासून दस-यापर्यंत मासेमारीचा मोठा हंगाम असे. यावेळी मासे पकडणे सोपे असे.[११]

<u>का सा र</u> :

कासाराचा व्यवसाय पेशवेकालीन महाराष्ट्रात होता. हे

बांगडया विकण्याचा व्यवसाय करीत असत. कासार हा एक खेडयातील व्यवसायिक असल्याने त्याचा गावातील अनेक व्यवसायिकांशी संबंध येई. या संबंधातुन त्यांच्यात वाद निर्माण होत असत. सन १७६८ मध्ये क-हाडच्या वाण्यानी कासाराच्या लग्नाची वरात मिरवत पेठेतून जाउ न देणे बद्दल हरकत घेतली होती.[१२]

कासाराला आपल्या व्यवसायाचा मोबदला म्हणून कांही कर द्यावा लागे. गावातील वतनदार मंडळीना सणाच्या आणि समारंभाच्या वेळी बांगडया दयाव्या लागत असत.[१३]

## तां बो ळी :

तांबोळी हा धंदेवाचक शब्द असुन यांचा मुख्य धंदा म्हणजे नागवेलीची पाने विकणे होय. तांबोळी लोक मराठया कुणब्यासारखे रहात असत. कित्येक तांबोळी या व्यवसायाला जोड म्हणून शेतीचा व्यवसाय करीत असत. ते हिंदु देवताना भजत आणि हिंदुचे सण साजरे करत असत.[१४]

डॉ.गोडेच्या मते ताबुंलाचा विडा खाण्याची प्रथा ही प्राचीन काळापासुनची आहे. तांबुल मंजरी या ग्रंथाचे संपादक "पदे"च्या मते तांबुल खाण्याची प्रथा वेदकाळापासुनची असावी. भारतीयांच्या वैयक्तीक आणि सामाजिक जीवनात तांबुलाला लाभलेले हे स्थान भारतीय लोकांच्या उत्साही वृत्तीचे एक प्रतीक होय.

तांबोळ्याच्या व्यवसायास गावातून महत्वाचे स्थान होते. गावात लागणारी विडयाची पाने तांबोळी पुरवीत असे. नवरात्रात व दसरा सणाच्या वेळी गावातील लोकांना पुजेसाठी विडयाची पाने त्याला पुरवावी लागत. त्याच्या मोबदल्यात तांबोळयास घटातील खोब-याची वाटी आणि कडाकणी मिळत असत.[१५] गावातील वतनदार मंडळीना विडयाची पाने पुरविण्याचे काम तांबोळयाला करावे लागे. देशमुख व देशपांडे यांना सुध्दा तांबोळी पाने पुरवत असत. इ.स.१७७० मध्ये कसबे वामोरी तर्फ राहोरी परगणे संगमनेर येथील तांबोळी तेथील शेटयाना दरबेली १०० पाने देत असत.[१६]

इ.स.१७७० मध्ये गराडीच्या तांबोळ्याने एका कुलकर्णीविरुध्द तक्रार केली होती.की, आपली वतनी जागा होती ती गावक-यानी कुलकर्ण्यास दिली. ती जागा मिळावी तसेच तांबोळी गावात असता विडयाची पाने वाण्यानी विकू नये अशी तक्रार केली होती.[१७]

वरील माहितीवरुन गावात पाने विकण्याचा धंदा हा तांबोळ्याचा होता असे दिसून येते. इ.स.१७८३ मध्ये मौजे ग-हाडे ता.क-हेपठार प्रांत पुणे येथील तांबोळी कासीम बीन बाजी तांबोळी यास तांबोळीपणाचे वतन दिले गेले आणि त्यास हकिमास हक्काची विडयाची ५० पाने द्यावी आणि दिवाणसारा म्हणुन दोन रुपये द्यावा असे ठरवून हे वतनपत्र दिले गेले होते.[१८]

शिंपी :

शिंपी व्यवसाय पेशवेकालीन खेडयातून दिसुन येतो. शिंप्यांची

वस्ती प्रामुख्याने महाराष्ट्रात व कर्नाटक या भागातून आढळून येते. शिंपी समाजात शिंप्याचा व्यवसाय करणारे लिंगायत जैन व मुसलमान आढळतात.[१९] घु-हेच्या मते शिंपी जातीत अहिर आणि मराठी शिंपी असे दोन पोट भाग होते.[२०] तर गोखल्यांचे मते शिंपी जातीत मराठा शिंपी आणि तेलंग शिंपी असे दोन भाग होते.[२१] पुण्यातील शिंपी श्रीमंत होते.[२२]

सासवड आणि सुपे येथील शिंप्याचा इ.स.१७३८ मध्ये जेवणा-बद्दल वाद निर्माण झाला होता. सासवडच्या गोत पंचायतीने निर्णय दिल्या नंतर तो वाद संपुष्टात आला.[२३]

पेशवेकालात शिंप्याचा आणि रंगा-याचा वाद निर्माण झाला होता. त्यावरुन जे नामदेव शिंपी आहेत त्यांनी शिवण्याचे काम करावे असे कैलास वासी छत्रपती शाहू महाराजानी निकाल करुन वाद मिटविला होता. यावरुन आपल्याला असे दिसून येते की, शिंप्याचे काम हे कपडे शिवण्याचे होते. शिंपी समाजात मानाने रहात असत. एखाद्या वेळी गावातील पाटलाने त्रास दिला तर ते कमाविस-दाराकडे तक्रार करत असत.[२४] यावरुन शिंपी जातीला समाजात चांगली वागणुक मिळत असे असे दिसते. पेशवेकाळात शिंपी आणि निलारी यांचा रोटी बेटी व्यवहार होत नसे.[२५]

## तेली :

तेली ही महाराष्ट्रातील एक व्यवसायिक जात होती. तेल्याची

वस्ती भारतात सर्वत्र आढळून येते. हे लोक तेल गाळणे आणि विकणे हा व्यवसाय करीत असत.[२६]

तेल्याचा तेल काढण्याचा आणि विकण्याचा धंदा हा वंश - परंपरागत चालत आलेला होता. ते नारळ, करडी, भुईमुग इत्यादी पासुन तेल गाळत असत. त्याच बरोबर जवस, अंबाडी, तिळ या बिया पासुनही ते तेल गाळत असत. त्यांच्या स्त्रिया त्याना कामात मदत करीत असत. पुण्यामध्ये मराठा तेली आणि लिंगायत तेली यांचा जास्त भरणा होता.[२७] १८३० मध्ये पुण्यात तेल्यांची ३४ घरे होती असे गोरवल्यांचे म्हणणे आहे.[२८]

तेल्याना आपल्या व्यवसाया संबंधीत गावातील वतनदाराना सणावाराला तेल द्यावे लागे.[२९] भाद्रपद महिन्यात पाटलाच्या घरी गौरीसाठी तेल द्यावे लागे.[३०]

पेशवाईत कांही खेडयामधुन तेल्याचा धंदा वाणी करत असत आणि वाण्याचा धंदा इतर लोक करीत असत. परंतु १८०६ मध्ये याच कारणावरुन तेल्याचा आणि वाण्याचा वाद निर्माण झाला होता. या मध्ये वाण्याने तेल विकू नये आणि तेल्याने भुसार विकू नये असा तोडगा निघाला आणि विकल्यास गुन्हेगारी द्यावी असा आदेश दिला गेला.[३१]

तेल्याला गावगाडयाशी निगडीत कांही कामे करावी लागत. गावामध्ये लग्न असेल तर नवरा गावात येते समयी तेली नव-याच्या समोर गाडा नेत असे. या कामाबद्दल त्यास शेला मिळे.[३२]

पेशवेकाळात तेली आपल्या व्यवसायाचा कर देत असत. वामोरी पेठ वसविण्या बद्दल कांही हक्क देऊ केले होते. यामध्ये तेल्यानी शेटे यांना दर घाण्यास पावशेर तेल द्यावे असे उल्लेख आहेत.[३३] गावामधुन व्यवसाय करणा-या लोकांच्या विशिष्ट अशा खुणा असत. तेली याची खुण पाहार होती असे तत्कालीन कागदपत्रावरुन दिसून येते.[३४]

इतर व्यावसायिक :

वा णी :

वाण्याचा दुकानदारी व्यवसायात समावेश होत असे. क्रावफोर्डच्या मते दुकानदारी व्यवसाय करणारे अनेक लोक महाराष्ट्रात होते. त्यामध्ये प्रामुख्याने मुसलमान, हिंदु, खोजा, वाणी भाटीया आणि गुजर यांचा समावेश होत असे.[३५] खेड्यातील दुकानदारी ही जागेवर, यात्रेत, आणि आसपासच्या कसब्याच्या ठिकाणी चाले.[३६] या दुकानदारामध्ये आपली दुकाने लावण्याच्या जागेवरुन वाद निर्माण होत असत. इ.स.१७३० च्या डिसेंबरात श्री.कोंढाणेपुरचे यात्रेत पुण्याचे शिंपी आणि सासवडचे शिंपी यांच्यात दुकानाचे पाले लावण्यावरुन भांडण निर्माण झाले होते.[३७] गोरवल्यांच्या मते दुकानदारीचा व्यवसाय लिंगायत, कुणबी, बळागर, पंचम, आणि गवळी सुध्दा करीत असत.[३८]

कांही गावामधून आठवड्याचे बाजार भरत असत. त्यामध्ये मुसलमान मोची, चांभार, खाटीक यांची दुकाने असत.[३९]

वाणी वापरत असलेली वजने मापे ही वर्षाला सरकारी अधिका-याकडून तपासून घेतली जात. अन्यथा दुकानदारावर गुन्हेगारी लादली जात असे.[४०] दुकानदारीच्या व्यवसायावरून वाणी आणि गुजर यांच्यात वाद निर्माण होत असे. इ.स.१७९९ मध्ये जेजुरी गावामध्ये वाण्याची दुकाने असताना गुजर आपले दुकान घालू लागल्यावर त्यावर वाण्याने दुकान घालण्यास हरकत घेतली होती.[४१]

वाण्याना दुस-या ठिकाणी माल नेताना कर द्यावा लागे. सन १७४० ला मौजे बावडे, ता.हवेली, कोल्हापूर या गावातुन वाण्याकडून कर घेतल्याचा उल्लेख आढळतो.[४२]

पटवेगार :

पटवेगाराचा व्यवसायही पेशवेकालीन महाराष्ट्राच्या कांही भागातुन दिसून येतो. पटवेगाराचे मुख्य काम म्हणजे रेशीम धंदा होय. याच धंद्यावरुन पटवेगार आणि जंगम यांचा वाद निर्माण झाला होता. त्यावेळी पैठण येथे सभा होऊन पटवेगाराचे काम पटवेगारानी करावे आणि जंगमाचे काम जंगमानी करावे असे अभयपत्र पटवेगाराला देण्यात आले होते.[४३]

पटेवेगाराला आणखी कांही कामे करावी लागत असत. घोडयाना सज्ज करण्यासाठी लागणारे साहित्य आणि पालखीसाठी लागणारे साहित्य ते तयार करत असत.[४४]

रेशीम व्यवसाय पटवेकरी करीत असत. त्यांना व्यवसाया-बद्दल कर द्यावा लागे.

## आत्तार :

अत्तार ही एक मुसलमानातील जात होती. याना पेशवेकाळात गंधी म्हणत असत. सुवासीक द्रव्ये, दंतमंजन व कुंकु विकण्याचा व्यवसाय हे अत्तार करीत असत.[४५] अत्ताराना कांही ठिकाणी अत्तारकीची वतने मिळत असत असे एका उल्लेखावरुन दिसून येते.[४६]

## रंगारी :

अनेक व्यवसायिकांप्रमाणे कपडयाना रंग देणा-या रंगा-यांचा व्यवसाय पेशवेकालीन समाजात होता. या जातीत छीप, भावसार, निलारी आणि निल्लार यांचा समावेश होत असे. रंगारी लोकांचा व्यवसाय म्हणजे सुती कपडयाना रंग देणे हा होय. कापड रंगविण्या-साठी जे लोक निळ वापरत असत त्याना निलारी म्हटले जाई.[४७] कपडयाना रंग देण्याचे काम कांही ठिकाणी शिंपी करत असत. परंतु कपडयाना रंग देण्याचा अधिकार त्याना नव्हता. इ.स.१७८३ मध्ये सासवड येथे कपडयाना रंग देण्याच्या कामावरुन शिंपी आणि रंगारी यांचा वाद झाला होता.[४८]

संगमनेर येथील शिंपी, रंगारी, साळी यानी येथील मुकादमा-च्या त्रासामुळे हवेलीच्या कामाविसदाराकडे तक्रार केली होती.[४९]

यावरून पेशवेकाळात कपडयाना रंग देण्याचे काम रंगारी करीत असत असे दिसून येते.

बु रु ड :

पेशवेकालीन महाराष्ट्रात बुरुडाचा व्यवसाय करणारी अनेक मंडळी होती. त्यांचा प्रमुख व्यवसाय म्हणजे सुपे, टोपली इत्यादी संसारोपयोगी साहीत्य, गावक-याना बनवून देणे होय. परंतु या कामाबरोबर समारंभाच्या वेळी वेताचे काम बुरुड जातीतील लोक करीत असत.[50] सन १७९८ मध्ये सोमेश्वर दिक्षीत यांनी यज्ञ करण्याचे ठरवीले होते. त्यावेळी कामे करणा-या माणसांत बुरुड कामाचा उल्लेख येतो.[५१]

बुरुडाचा व्यवसाय सुपे, टोपली नवीन तयार करणे, आणि कांही जुनी सुपे, टोपली साधने हा होता. इ.स.१७१० मध्ये चांभार व बुरुड यांच्यामध्ये वाद निर्माण झाला होता. त्यात चांभाराने बुरुडाचे चप्पल सांधण्याचे नाकारले आणि बुरुडानी चांभाराची सुपे,टोपली सांधण्याचे नाकारले होते.[५२]

ग व ळी :

गवळयाचा व्यवसाय प्रामुख्याने दुध विकणे, दुधापासुन तयार होणारे पदार्थ विकणे, हा होता. त्याच बरोबर म्हैशी पालन करणे हा त्यांचा प्रमुख धंदा असल्याने त्यांच्या धंद्यात त्यांच्या स्त्रिया त्यांना मदत करीत असत. गवळयाचे पुरुष आणि स्त्रिया हे नेहमी कामामध्ये

गुंतलेले असत असे क्रावफोर्डचे म्हणने आहे.[५३] गवळ्यामध्ये अहिर, कोकणी व लिंगायत या पोटजाती होत्या.[५४]

पाथरवट :

पेशवेकालीन महाराष्ट्रात पाथरवटाचा व्यवसाय अस्तीत्वात होता असे दिसते. यांचे मुख्य काम म्हणजे घराची बांधकामे, विहीरीची बांधकामे आणि तळयाच्या दगडी भिंतीचे काम होय. सन १७२१ च्या पत्रावरुन विरुबाईनी ब्रम्हेंद्रस्वामींना विहीरीच्या बांधकामासाठी पाथरवट पाठवून देण्या विषयी कळविले होते.[५५]

पाथरवट मोठाल्या तळयाची भिंती बांधत असत. इ.स.१७३१ च्या पत्रात धावडसीच्या तळयाचे बांधकाम करण्यासाठी पाथरवटाना पाचारण करण्यात आले होते असा उल्लेख आहे.[५६]

वरील पत्रावरुन पाथरवटाचा व्यवसाय हा बांधकामासाठी दगडाना आकार देण्याचा होता असे समजून येते.

विणकर :

विणकाम व्यवसायात साळी जातीतील लोकांचा फार मोठया प्रमाणात भरणा होता. त्यांची उपजिवीका याच व्यवसायावर चाले. इ.स.१७३१ मध्ये निंबच्या मठाच्या गोसाव्यास हवेली वाई येथील साळी, कोष्टी, धनगर यांच्याकडून कांबळी व पासोडी देण्याविषयी सरकारातून

हुकुम झाले होते.[५७] सन १७७८ मध्ये संगमनेरच्या साळ्यांनी पाटलाकडून होणा-या त्रासाबद्दल कमाविसदाराकडे तक्रार केली होती.[५८]

साळ्याप्रमाणे कोष्टी सुध्दा हा व्यवसाय करीत असत. साळी आणि कोष्टी याना दरमाणसी दरसाल कर म्हणून पासोडी द्यावी लागे.[५९] साळी, कोष्टी यांच्याप्रमाणे धनगरसुध्दा मेंढराच्या लोकरीच्या घोंगडया विणत असत.[६०]

या इतर जाती प्रमाणे जेजुरी येथील जंगम आणि पटवेकरी सुध्दा विणकामाचा व्यवसाय करीत असत. विणकाम व्यवसायावरुन पटवेकरी व जंगम यांच्यात वाद निर्माण झाला होता. त्याचा निकाल लागून रेशीम काम पटवेकरानी करावे आणि सुती काम जंगमानी करावे असे ठरले गेले. हा निवाडा १७२५ सालातील आहे.[६१]

वरील सर्व माहितीवरुन विणकाम व्यवसायात साळी, कोष्टी, धनगर, पटवेकरी, जंगम या जातींचा समावेश होत असे हे दिसते. या सर्व जाती आपला व्यवसाय हातमागावर करीत असत. आणि प्रत्येक मागास त्याना कर द्यावा लागे. गावातील वतनदार मंडळीना घोंगडी, धोतरजोडी द्यावी लागे.

चौल येथे रेशमी कापड विणण्याचा व्यवसाय संपुष्टात आला असताना तो पुन्हा उर्जीतावस्थेत यावा म्हणून आंग्रेनी प्रयत्न केले होते. इ.स.१७३४ मध्ये लखमाजी, सातपुत्या, यताजी भावेकर, हरबाजी भंडारी,

धोंडोजी काजवा यानी चौल येथे माग घालुन त्यांनी वर्षाला प्रत्येक मागास ३ रुपये महसुल द्यावा असे ठरले होते.[६२]

वरील गोष्टींचा विचार करता हस्तव्यवसाय हे पेशवेकालीन महाराष्ट्रातील पुष्कळ लोकांच्या चरितार्थाचे साधन होते. कापडाचा व्यवसाय हातमागावर होत असल्या कारणाने वस्त्रोत्पादन कला ही पित्याकडून पुत्राकडे वंशपरंपरेने संक्रमीत होत गेली.[६३] कांही रेशमी वस्त्रे पेशवाईत भारतातुन परदेशात निर्यात होऊ लागली होती. सर्व प्रकारचे कापड हातमागावर होत असल्यामुळे पेशवाईच्या काळात मागावर काम करणाऱ्याच्या मोठा वर्ग महाराष्ट्रात निर्माण झाला होता. परंतु मुंबई बंदर इंग्रजानी घेतल्यानंतर मुंबईत कापड धंद्याला उत्तेजन दिले गेले आणि अनेक कोष्टी मुंबईस जाउन स्थाईक झाले.[६४]

कापड व्यवसाय मध्ययुगीन भारतातील सर्वात महत्वाचा आणि लोकप्रिय उद्योग होता. कापशीचे पीक भारतात मोठ्या प्रमाणावर होत असे. कुटीरोद्योग आणि मोठे उद्योग दोन्हीतही कापसापासून कापड बनवले जाई.[६५]

डॉ.चिटणीसांच्या मते कापड बनविण्याच्या पध्दती या पारंपारिक होत्या. झाडापासून कापूस वेगळा करुन कापड बाजारात येई पर्यंत त्यावर निरनिराळ्या प्रक्रीया केल्या जात. प्रथम कापसातील सरकी काढुन कापुस स्वच्छ केला जाई. त्यानंतर गोल चाकाच्या सहाय्याने धागे विणत. त्यानंतर त्या धाग्यापासून मागावर कापड बनविले जाई. कापड स्वच्छ करण्यासाठी लिंबु, चुना आणि साबण यांचा वापर केला जाई.[६६]

सुती व रेशमी वस्त्रे तयार करणे हा व्यवसाय शेती व्यवसायासी निगडीत असल्याने व्यापक प्रमाणावर व विस्तीर्ण प्रदेशात अस्तित्वात होता. कित्येक गरीब कुटुंबे या व्यवसायावर आपले पोट भरत असत. स्त्रिया रात्री उशिरापर्यंत जागून सूत कातत. नागरपुरमध्ये तयार होणा-या सफेद लिनला परदेशात मागणी असे. तसेच ब-हाणपूर हे शहर तेथे तयार होणा-या चिटाच्या कापडासाठी प्रसिध्द होते आणि पुण्याच्या बाजारपेठेत त्याला मागणी असे. औरंगाबाद शहर सुध्दा मिश्र रेशीम वस्त्रे आणि सुती जरीची वस्त्रे यासाठी प्रसिध्द होते.[६७]

भावेंच्या मते पेशवाईत वाफेचा शोध न लागल्यामुळे मनुष्याचा गरजा मनुष्याच्या अंगमेहनतीने भागत असत. मनुष्याच्या आवश्यक गरजे पैकी वस्त्र ही एक आवश्यक गरज होती. हिंदुस्थानच्या ब-याच भागात कापूस पिकत असल्याने तो पिंजणे, कातणे व त्यापासुन वस्त्र विणणे व ते शेवटी शिवणे या श्रमाच्या कौशल्याच्या क्रिया होत. त्यातल्या त्यात सूत अतिशय बारीक कातणे व त्याचे अत्यंत तलम कापड विणणे या क्रिया साठी माणसास कसब असणे गरजेचे असे.[६८]

मध्ययुगीन महाराष्ट्रात कापसापासुन तयार केलेल्या विविध वस्तु दिसून येतात. त्यामध्ये स्त्रिया वापरत असलेली परकर, लेंगा, ओढण्या, काचोळी, चोळया आणि पुरुष वापरत असलेले धोतर, अंगरखा, विजार, डगला आणि फेटा यांचा समावेश होतो.[६९]

मराठा काळात धोतरे तयार करणारी अनेक ठिकाणे होती. विशेषत: सासवड, सुपे, टाकळी इत्यादी केंद्रातुन धोतरजोडया तयार होत.

तसेच महेश्वर, नागपूर, पैठण, सोलापूर, आष्टी, चांदवड या पेठातून धोतरांची विक्री होत असे.[७०] पुण्यात मनाजोगी धोतरजोडी न मिळाल्यामुळे १७६५ मध्ये माधवरावांनी नाना फडणीसाकडून धोतरजोडया पैठणहून मागवून घेण्याविषयी कळविले होते.[७१] धोतरजोडयाची लांबी ही ११ ।। हात लांब असे तर रुंदी २ ।। ते २ ।।। हात लांब असे. पुण्यातील खाजगीवाले यांनी मुलांकरिता वापरलेल्या धोतर जोडयांची किंमत ४० रुपयापर्यंत होती. महेश्वरास तयार होणा-या धोतरजोडीची किंमत १० रुपयापासून १५ रुपयापर्यंत होती असे दिसते.[७२]

धोतरजोडयाप्रमाणे पागोटे पेशवाईत प्रसिध्द होते. हे डोक्याला बांधावयाचे एक वस्त्र होय. त्याच्या स्वरुपानुसार पागोटे, पगडी, तिवट, मंदील, फेटा, रुमाल अशी नावे दिसून येतात. चिटाचे कापड तिवटासाठी वापरले जाई. फैजापुर, नांदेड, कोटगिरी, जालना, शहादा, जुन्नर, धनाबाद आणि वानापूर येथे फेटे तयार होत असत.[७३]

कापड व्यवसायात सुती, रेशीम, ताग, लोकर या कापड उद्योगधंद्याचा समावेश होतो. सर्व सुती वस्तु हातमागावर तयार केल्या जात. या हातमाग व्यवसायाची प्रमुख केंद्रे म्हणजे सोलापूर, मालवणी, ढवळेश्वर, नागपूर, ब-हाणपूर इत्यादी होती. मालवणी येथे लुगडी व चोळखण तयार होत असत. तर राजापूर, चौल येथे सुध्दा कोष्टी कापड तयार करीत असत.[७४]

सुती कापड व्यवसायाप्रमाणे लोकरीपासून तयार होणारे कापड पेशवे काळात वापरले जाई. धामणी, बामणी, ढवळेश्वर, टाकळी या -

ठिकाणी लोकर पैदास करण्याचा व्यवसाय चाले. धनगर आणि सनगर हे मेंढरापासुन मिळणा-या लोकरीपासुन घोंगड्या विणण्याचा व्यवसाय करीत असत.[७५]

पेशवेकालीन महाराष्ट्रातील जहागीरदार, उच्च कुलीन लोक रेशमी वस्त्रे वापरीत असत. रेशीम उद्योग महाराष्ट्रात चौल येथे मोठया प्रमाणावर केंद्रीत झाला होता. पैठण आणि यवला येथे सुध्दा रेशमी कापडाचा व्यवसाय मोठया प्रमाणात चाले.[७६] रेशमी वस्त्रा-मध्ये गजनी, तापता, मखमल (मखमल), इलाचा इत्यादी वस्त्रांचा समावेश होत असे.[७७]

सुती, रेशमी, आणि लोकरी वस्त्राप्रमाणे जरीची वस्त्रे महाराष्ट्रात वापरली जात असत. जरीचा उत्पादन व्यवसाय पुणे, नाशीक येथे एकवटला होता. जरीचा उपयोग रेशमी वस्त्रात आणि वस्त्राचे काठपदर करण्यासाठी केला जाई. किनखाप बादली, चिरा, ही जरीची वस्त्रे पेशवाईन होती. पैठणप्रमाणे महाराष्ट्रात जालनापूर हे सुती आणि रेशमी कापडाच्या उत्पादनाचे केंद्र होते. चांदीच्या धाग्याचे उत्पादन हे तेथील वैशिष्टय होते.[७८] चांदी वितळवुन त्या पासून नाजुक धागा तयार करण्यात येत असे. हे धागे रेशमी वस्त्रात विणले जात असत. त्यासाठी केळीचा खार वापरण्यात येई.[७९]

चिटाचे कापड फार लोकप्रिय होते. ब-हाणपूर, नागपूर, सासवड आणि गंगासागर ही चिटाच्या उत्पादनाची केंद्रे होती.[८०]

अशाप्रकारे पेशवेकाळात विणकर विविध प्रकारची कापडे तयार करीत असत.

क ला ल :

कलाल म्हणजे दारू विक्रीचा व्यवसाय करणारे लोक होत. कलाल यास संस्कृतमध्ये कल्यपाल, कलवार, कलार, कलान अशी नांवे आढळतात. ठाणे जिल्हयात कलाल, कलार म्हणत असत.[८१]

मद्य म्हणजे एक प्रकारचे मादक पेय होय. प्राचीन काळापासून भारतीय लोक मादक पेय पीत असत. मद्य निर्मीतीची कला ही भारतीयाना प्राचीन कालापासून माहीत होती. त्यामुळे समाजातील सर्व थरात मद्यपानाची प्रथा रुढ होती. वेदकाळी सोम व सुरा अशा दोन मादक पेयांचा उपयोग केला जाई.[८२] सोम रस हे मद्य असून सोमनामक वनस्पती पासून हा रस काढलाजाई. सोमरस हा सोमनामक वल्ली कुटुन काढलेला व गाळलेला रस होय. तो इंद्रादी देवाच्या ठिकाणी मद म्हणजे कैफ व उत्कट आनंद निर्माण करतो असे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात.[८३]

रेगेंच्या मते पूर्वीच्या राज्यात मद्यपान हा गुन्हा मानला जाई. परंतु कांही ठिकाणी दारू विकली जाई.[८४]

मराठी राज्यात जे दारु विकत त्याना कलाल म्हणत असत. खाटीक किंवा तत्सम लोक दारुच्या भट्टया लावीत असत व विकण्याचा धंदा हा कलाल करत असे. शिवकालात द्राक्षापासुन तयार केलेली दारु किंवा मोहापासुन तयार केलेली दारु लोक पीत असत. पण दारुची दुकाने तुरळक होती. दारुच्या दुकानावर कोतवालाची व सरकारी अधिका-यांची नजर असे. गावात अगर चार गावाकरीता एक असे

कलालाचे दुकान असे आणि ते गावाबाहेर असे. परंतु एखादी व्यक्ती दारुच्या नशेत रस्त्याने धुंद झालेली दिसल्यास त्या व्यक्तीस सरकारातुन शासन होत असे.[८५]

शिवकालात बहुतेक अष्टप्रधान विद्वाण ब्राम्हण असल्यामुळे त्यांनी मराठी राज्यात दारु पिण्यापासून परावृत्त करण्यासाठी राजाकडून जबरदंडाची व कडक फटक्याची शिक्षा करण्याचे हुकुम काढले होते.[८६]

शिवकाळाप्रमाणे पेशवाईत सुध्दा दारु विक्री व्यवसाय मोठया प्रमाणावर चाले. पेशव्याचे सरदार व जहागीरदार यांनी आपल्या अंकित प्रदेशात किंवा शहरात दारु विकू नये अशी अट सरंजाम देताना घालण्यात येई. सवाई माधवरावाचे हे दारुवर निर्बंध राखण्याचे धोरण होते. पण पुढे सन १७७३ मध्ये मौजे जेजुरी येथे दारुपट्टी वसुल करण्यात आली.[८७]

दारु पिण्याचे प्रमाण वाढले व त्यामुळे गुन्हेगारी वाढु लागली. या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पेशवे सरकारनी या कलालाना दारुच्या भट्टया बंद करण्याचे व दारु विक्री व्यवसाय बंद करण्याचे हुकुम काढले होते.[८८]

पेशवे काळात दारुबंद करण्याचे हुकुम जरी काढले असले तरी दारुचा चोरटा व्यवसाय चालत असे. दारुचे साठे आणि चोरटी दुकाने शोधण्यासाठी नाना फडणीसाने फिरस्त्याचे प्यादे ठेवले होते. पेशवाईन

स्त्रिया या सुध्दा दारु विक्री व्यवसाय करत असत असा उल्लेख आढळतो. सन १७७६ मध्ये नारायण पेठेतील एक ब्राम्हण स्त्री दारुचा व्यवसाय करीत असे.[८९]

पेशवेकालात पुण्यातील कांही ब्राम्हण सुध्दा दारु पित असत. मौजे पेठ पारगाव, ता.खेड येथील बाळाजी धोंडदेव कुलकर्णी हा ब्राम्हण मांसभक्षण, सुरापान आणि कलावंतीणीशी समागम आणि यामध्ये अट्टल निघाला म्हणून त्याला पुण्यामधील ब्राम्हणांनी फार मोठी शिक्षा ठोठावली होती.[९०]

दारु पिउन स्त्रियासुध्दा गुन्हेगारी करीत असत. चिकोडी येथील सई देशमुखीण ही अशाप्रकारे वागत असे.[९१]

पेशवेकालात पाटील कुलकर्णी यांनी दारु पिउ नये म्हणून अनेक निर्बंध घातले होते. परंतु यातुनही कांही लोक दारु पीत असत. खेडचे पाटील विठोजी सुलतानपुरे याला सवाई माधवरावाने दारु पिण्याचा गुन्हा केल्यामुळे १०,००० रुपये गुन्हेगारी आकारली होती. सन १७८७ मध्ये एका कोतवालाला अशा गुन्हयामुळेच १०,०००/- रुपये दंड झाला होता.[९२]

वरील सर्व उदाहरणावरुन तत्कालीन सरकार जनतेच्या भल्यासाठी दारुबंदी सारखे कायदेकरुन मोडणाऱ्याना शासन क देत असे असे दिसते.

बलुतेदाराप्रमाणेच अलुतेदारांचेही व्यवसाय कांही ग्रामीण गरजा

भागविण्यासाठी महत्वाचे होते. कोळी मास्यासारखे अन्न जनतेला पुरवित तर तेली तांबोळ्याकडून तेल, पाने इ. जीवनावश्यक गोष्टींचा पुरवठा जनतेला होत असे. शिंपी लोकांचे कपडे शिवत तर कासार बांगड्या वगैरे स्त्रियांच्या गरजा पु-या करीत. इतर व्यावसायिकात वाणी, विणकर इ. व्यवसाय महत्वाचे होते. ग्रामीण लोकांच्या गरजा वाणी भागवत असे. तर कपड्यांचा मुलभूत प्रश्न विणकर सोडवत असत. अशाप्रकारे हे सर्व व्यावसायिक तत्कालिन जनतेच्या विविध गरजा पु-या करत असत.

-x-x-x-x-x-

सं द र्भ :


१. अत्रे टी.एन्. , गावगाडा, पृ.९.

२. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, पृ.४०.

३. डॉ.कर्णिक शशिकांत, पेशवेकालीन महाराष्ट्र, सामाजिक व आर्थिक जीवन, भा.इ.आणि सं., वर्ष-२४, पु.९३-९४, पृ.५२.

४. जोशी श.ना., मराठेकालीन समाजदर्शन, पृ.२२.

५. नाईक गजानन गोविंद, अणजुरकर नाईक घराण्याचा इतिहास,पृ.३८.

६. भा.इ.सं.मं., खं.२८, अंक - ३,४. पृ.५१.

७. राजवाडे वि.का., (सं), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खं.१५, पृ.२७१.

८. इरावती कर्वे, मराठी लोकांची संस्कृती, पृ. 732

९. वाड ग.चि., पेशवे रोजनिशी, खं.७, पृ.९०.

१०. कित्ता, पृ.९०-९१.

११. कित्ता.

१२. कित्ता, पृ.३३७.

१३. सरदेसाई गो.स.,पे.द., खं.३१, ले.१८७.

१४. महाराष्ट्रीय ज्ञानकोश, खं.१५, पृ.४८.

१५. जोशी श.ना., मराठेकालीन समाजदर्शन, पृ.१९.

१६. वाड ग.चि., पे.रो., खं.७, ले.७१२.

१७. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.४४.

१८. कित्ता, पृ.५०.

१९. Enthoven, The Tribes and Caste of Bombay, Vol. III, P.328.

२०. Ghurye G.S., Caste and Race in India, P.37.

२१. Gokhale B.G., Poona in the 18th Century An Urban History, P.162.

२२. Crowford, History of Poona and Deccan , P.213.

२३. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.३१.

२४. वाड ग.चि., पे.रो., खं.८, पृ.१५८.

२५. सरदेसाई गो.स., पे.द., खं.४३, पृ.३६,३७.

२६. भा.स.को., खं.४, पृ.१८२.

२७. Gadgil D.R., Poona Socio Economic Survey ,Part-I,P.170.

२८. Gokhale B.G., Poona in the 18th Century An Urban History, P.23.

२९. चापेकर ना.गो., पेशवाईच्या सावलीत, पृ.४७.

३०. जोशी श.ना., मराठेकालीन समाजदर्शन, पृ.१८.

३१. आपटे,ओतुरकर, महाराष्ट्राचा पत्ररुप इतिहास,पृ.२२७.

३२. पवार ए.जी., ता.का.का.,खं.१, पृ.३३५-३९.

३३. सरदेसाई, पे.द., खं.४३, पृ.४१-४२.

३४. पुरंदरे कृ.वा., पुरंदरे दप्तर, भाग-१, पृ.५९.

३५. Craford, History of Poona and Deccan in a Perspective, P.221.

३६. अत्रे टी.एन., गावगाडा, पृ.९९, १०३.

३७. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.

३८. Gokhale B.G., Poona in the 18th Century, An Urban History, P.162.

३९. गवळी पी.ए., पेशवेकालीन जातीय संघर्ष, पृ.९८.

४०. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.८२,८३.

४१. कित्ता, ८३,८४.

४२. पवार ए.जी., ता.का.का., खं.२, पृ.२२४.

४३. वाड ग.चि., पे.रो., खं.९, पृ.१५३.

४४. Gokhale B.G., OP. Cit., P.161.

४५. भारतीय संस्कृती कोष, खं.३, पृ.११६.

४६. वाड ग.चि., पे.रो., खं.१, पृ.१७१.

४७. भा.सं. कोष, खं.६, पृ.६८९

४८. ओतुरकर रा.वि., पे.सा.आ.प., पृ.१००

४९. वाड ग.चि., खं.८, पृ.१५८.

५०. पवार ए.जी., ता.का.का., खं.१, पृ.२३०.

५१. वाड ग.चि., पे.रो., खं.५, पृ.२५७-५८.

५२. पवार ए.जी., ता.का.का., खं.१, पृ.२३०.

५३. Craford, OP. Cit., P.262.

५४. Gokhale B.G., OP. Cit, P.162.

५५. राजवाडे वि.का., म.इ.सा., खं.३, पृ.१६.

५६. ढबु दा.गो., आंग्रे घराण्याचा इतिहास, पृ.८०.

५७. राजवाडे वि.का., म.इ.सा.,खं.१५, पृ.४३.

५८. वाड ग.चि., पे.रो.,खं.८, ले.९९९.

५९. कित्ता, खं.७, पृ.२८६, ले.७१२.

६०. जोशी श.ना., मराठेकालीन समाजदर्शन पृ.४८.

६१. मेहंदळे, पोतदार, भा.इ.सं.मं., चतुर्थ संमिलन वृत्त,शके१८३८,पृ.१४४.

६२. भा.इ.स.मं., व.२८, अंक ३,४, पृ.२१.

६३. कर्णिक, OP. Cit., पृ.४९.

६४. शेणोलीकर, देशपांडे, महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, पृ.३०१.

६५. Moreland, India at the death of Akbar, P PP. 180-181.

६६. चिटणीस के.एन्., मध्ययुगीन भारतीय संस्था व संकल्पना, भाग-३, पृ.१२.

६७. कर्णिक, OP.Cit., पृ.५५.

६८. भावे वा.कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.२६१.

६९. कित्ता, पृ.२६७.

७०. कित्ता.

७१. सरदेसाई गो.स., पे.द., खं.३२, पृ.९२.

७२. वाड ग.चि., पे.रो., खं.७, पृ.२८९.

७३. भावे वा.कृ., पे.महाराष्ट्र, पृ.२६५.

७४. कित्ता, २७२.

७५. जोशी श.ना., मराठेकालीन समाजदर्शन, पृ.४८.

७६. Gadgil D.R., Socio Economic Survey of Poona, P. 103.

७७. भावे वा.कृ., पे.महाराष्ट्र, पृ.२७१.

७८. वाड ग.चि., पे.रो., खंड ८, पृ.२३६.

७९. कित्ता.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

८०· चापेकर ना·गो·, पेशवाईच्या सावलीत, पृ·१९८·

८१· महाराष्ट्रीय ज्ञानकोष, खं·१७, पृ·१७१·

८२· भा·स·को·, खं·६, पृ·६९५·

८३· तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी,प्राचीन भारतीय संस्कृतीतील मद्यविषयक आचारसंहिता, नवभारत, वर्ष ३१, अं·८, पृ·१·

८४· रेगे, स्थळ, काल, जीवन आणि मद्य, नवभारत, वर्ष-३१, अं·८·

८५· खोबरेकर वि·गो·, मराठेशाहीतील मद्यपान विषयक धोरण आणि शासन व्यवस्था, नवभारत, वर्ष-३१, अं·८, पृ·५०-५१·

८६· भा·इ·स·मं·, जाने·-जुलै,१९५०, ले·११·

८७· चापेकर ना·गो·, पेशवाईच्या सावलीत, पृ·४१·

८८· सरदेसाई गो·स·, पे·द·,खं·४३, पृ·३६·

८९· कित्ता, ले·१४४·

९०· कित्ता, खं·४०, ले·२९·

९१· खोबरेकर वि·गो·, मराठेशाहीतील मद्यपान विषयक धोरण आणि शासन व्यवस्था, नवभारत, वर्ष-३१, अं·८, पृ·५०-५१·

९२· वाड ग·चि·, पे·रो·, खं·३, पृ·१९९·

=0=0=0=0=0=